जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2024
पुढारी



कोल्हापूर : शरण साहित्य अध्यासनासाठी देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना डॉ. तृप्ती करेकट्टी. सोबत यश आंबोळे.

# डॉ. तृप्ती करेकट्टी यांच्याकडून शरण साहित्य अध्यासनास देणगी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी शरण साहित्य अध्यासनासाठी २१ हजार रुपयांची देणगी प्रदान केली. देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

विद्यापीठातील शरण साहित्य अध्यासनासाठी लोकवर्गणीतून निधी संकलन केले जात आहे. महात्मा बसवेश्वर व त्यांच्या सहकारी शरण-शरणींनी निर्माण केलेल्या साहित्याचे अध्ययन, अध्यापन, संशोधन आणि प्रकाशन यासाठी हा निधी वापरण्याचे नियोजन आहे. विविध समाज घटकांकडून विद्यापीठास यासाठी देणगी दिली जात आहे. याप्रसंगी यश आंबोळेंसह मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2024
पुण्यनगरी

# डॉ. करेकट्टींकडून शरण साहित्य अध्यासनास देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी शरण साहित्य अध्यासनासाठी २१ हजारांची देणगी प्रदान केली. शिवाजी विद्यापीठातील शरण साहित्य अध्यासनासाठी लोकवर्गणीतून निधी संकलन केला जात आहे. महात्मा बसवेश्वर आणि त्यांच्या सहकारी शरण-शरणींनी निर्माण केलेल्या साहित्याचे अध्ययन, अध्यापन, संशोधन आणि प्रकाशन यासाठी सदरचा निधी वापरण्याचे नियोजन आहे. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी शुक्रवारी शरण साहित्य अध्यासनासाठी २१ हजार रुपयांच्या देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी यश आंबोळे उपस्थित होते.

अभ्यासक कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2024
पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना प्राणीशास्त्र अधिविभागाचे माजी विद्यार्थी.

# लोकस्मृती वसतिगृहास प्राणीशास्त्र विभागाच्या माजी विद्यार्थ्यांकडून ५१ हजारांची देणगी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी ५१ हजार १११ रुपयांची देणगी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली. प्राणीशास्त्र व रेशीम शास्त्र अधिविभागाच्या १९९७-९९ बॅचमधील माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एकत्र येऊन विद्यापीठात लोकवर्गणीतून साकारत असलेल्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहास पाठबळ देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शुक्रवारी विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेऊन त्यांच्याकडे निधीचा धनादेश सुपूर्द केला. विद्यापीठाच्या अन्य माजी विद्यार्थ्यांसाठी या बॅचची देणगी आदर्शवत स्वरूपाची असल्याचे गौरवोद्गार कुलगुरूंनी काढले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2024
पुण्यनगरी

# 'प्राणीशास्त्र'च्या माजी विद्यार्थ्यांकडून 'लोकस्मृती'ला देणगी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी ५१ हजार १११ रुपयांची देणगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली. प्राणीशास्त्र व रेशीमशास्त्र अधिविभागाच्या सन १९९७-९९ बॅचमधील माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एकत्र येऊन विद्यापीठात लोकवर्गणीतून साकारण्यात येत असलेल्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहास बळ देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शुक्रवारी या बॅचने कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेऊन त्यांच्याकडे ५१ हजार १११ रुपयांच्या निधीचा धनादेश सुपूर्द केला. 'आम्ही आमच्या बॅचच्या वतीने हा निधी कृतज्ञतापूर्वक विद्यापीठास देत असून, त्यामध्ये कोणाचेही वैयक्तिक नाव न येता, बॅचच्याच नावे हा निधी वापरावा,' अशी विनंती त्यांनी केली. या त्यांच्या भावनिक आवाहनाचे कुलगुरूंनी स्वागत केले. विद्यापीठाच्या अन्य माजी विद्यार्थ्यांसाठीही या बॅचची देणगी आदर्शवत स्वरूपाची असल्याचे गौरवोद्‌गार त्यांनी काढले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2024
लोकमत




आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेतील द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक सुरजीत अडगळे याने मान्यवरांच्या हस्ते स्वीकारले. यावेळी डॉ.सिद्धेश्वर जाधव, राहुल जाधव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# 'अन्वेषण' संशोधन स्पर्धेत सुरजीत द्वितीय

## मुंबई विद्यापीठात स्पर्धेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा संशोधक सुरजीत अडगळे याच्या 'सिंथेसाइझिंग बायोप्लास्टीक अँड वेगन लेदर' या संशोधनास मूलभूत विज्ञान प्रकारामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. मुंबई विद्यापीठात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अन्वेषण स्पर्धा पार पडल्या.

सुरजीत अडगळे याने निवडुंगाच्या गरापासून जैविक प्लास्टिक आणि चामडे यशस्वीपणे बनवून या प्रकल्पाचे स्पर्धेत सादरीकरण केले. या स्पर्धेत सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयाच्या सुरजीत घनश्याम अडगळे याला द्वितीय क्रमांक मिळाला. आंतरराष्ट्रीय अन्वेषन संशोधन स्पर्धेमध्ये विविध विषयांतील पदवी, पदव्युत्तर व पीएच.डी संशोधक अशा त्रिस्तरीय स्पर्धेत देशातील २८ विद्यापीठांतील एकूण १५७ विद्यार्थी सहभागी झाले. सुरजीत अडगळे याच्या प्रकल्पाला मूलभूत विज्ञान गटात द्वितीय क्रमांक मिळाला. यावेळी संघ व्यवस्थापक म्हणून राहुल जाधव, अन्वेषण समन्वयक म्हणून डॉ.सिद्धेश्वर जाधव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2024
लोकमत

# विद्यापीठात व्यवसाय विकास कार्यशाळा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या एसयूके रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट या सेक्शन-८ कंपनीमार्फत विद्यापीठ व परिसरातील नागरिकांसाठी व्यवसाय विकास कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेस गोवा येथील अर्थ बिझनेस कन्सल्टन्सीच्या ऋतुजा साबणे यांनी अर्थ कन्सल्टन्सी सर्व्हिसेस उद्योगांची ओळख, तंत्र व उद्योग चालू करण्याचे सोप्या भाषेत समजावून सांगितले.

प्रा. एम. एस. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये नोकरी मिळणे कठीण होणार आहे, त्यामुळे त्यांनी आतापासूनच स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची तयारी करावी लागेल, असे सांगितले. नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य विभागाचे संचालक प्रा. एस. डी. डेळेकर यांनी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र इनोव्हेशन सोसायटीने ५ कोटी, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाने एक कोटी रुपये उद्योगांना बीजभांडवल देण्याचे मान्य केले असून, याचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी डॉ. एम. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, विष्णू खाडे उपस्थित होते. शिवानंद पाटणे यांनी आभार मानले.

23 MAR 2024

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात व्यवसाय विकास कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एसयुके रिसर्च अँण्ड डेव्हलपमेंट सेक्शन-८ कंपनीच्या वतीने व्यवसाय विकास कार्यशाळा झाली. कार्यशाळेस गोवा येथील अर्थ बिझनेस कन्सलटन्सीच्या रुतूजा साबणे, मानवविज्ञान अधिष्ठाता प्रा. एम. एस. देशमुख, नवोपक्रम व नवसंशोधन विभागाचे संचालक प्रा. एस. डी. डेळेकर यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे डॉ. एम. एम. गुरव यांनी सहभागी विद्यार्थ्यांनी उद्योग कार्यशाळा यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले.

23 MAR 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात व्यवसाय विकास कार्यशाळेचे उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट या सेक्शन-८ कंपनीमार्फत विद्यापीठ व परिसरातील नागरिकांसाठी 'व्यवसाय विकास कार्यशाळा' दि. २१ व २२ मार्च रोजी घेण्यात आली. कार्यशाळेस गोवा येथील अर्थ बिझनेस कन्सलटन्सीच्या ऋतुजा साबणे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मानव विज्ञानचे अधिष्ठाता प्रा. एम. एस. देशमुख म्हणाले, विद्यार्थ्यांनी आतापासूनच स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची तयारी करावी. नोकरी मागत फिरण्यापेक्षा स्वतःचा व्यवसाय सुरू करावा लागणार आहे. यावेळी प्रा. एस. डी. डेळेकर यांनी मत मांडले. तज्ज्ञ मार्गदर्शिका ऋतुजा साबणे यांनी कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी उपस्थित विद्यार्थ्यांच्या नवकल्पनेतून उद्योग सुरू करण्याकरिता मार्गदर्शन केले. समारोपाचे प्रमुख पाहुणे वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे विभागप्रमुख डॉ. एम. एस. गुरव यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे प्रशस्तीपत्र देऊन अभिनंदन केले. स्वागत डॉ. पी. डी. राऊत, आभार शिवानंद पाटणे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यापीठातील अधिसभा सदस्य विष्णू खाडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 MAR 2024
पुण्यनगरी

# नॅनो सायन्सच्या विनय पाटीलची दक्षिण कोरियात पीएच.डी.साठी निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड



टेक्नॉलॉजी अधिविभागातील विनय पाटील (रा. इस्लामपूर, जि. सांगली) याची दक्षिण कोरिया येथील क्युंग ही युनिव्हर्सिटी येथे ऑर्गेनिक ऑप्टो-इलेक्ट्रॉनिक्स या विषयामध्ये पीएचडीसाठी निवड झाली आहे. विनयला अधिविभागातील रसायनशास्त्राचे प्रा. डॉ. सुशीलकुमार जाधव यांचे मार्गदर्शन मिळाले. विनयने २०१७ ते २०२२ या कालावधीत बीएस्सी - एमएससी नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (पाच वर्षांचा एकात्मिक) अभ्यासक्रम पूर्ण केला. अधिविभागात ग्रॅज्युएशनपासूनच योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळे तसेच संशोधनाची आवड निर्माण झाल्यामुळे हे यश मिळवू शकलो, अशी भावना विनय याने व्यक्त केली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी संचालक डॉ. किरण कुमार शर्मा यांनी त्याचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2024

पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्रातील २१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील २१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा शुक्रवारी सुरळीतपणे पार पडल्या. विद्यापीठाच्या वतीने सध्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. शुक्रवारी बॅचलर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ व्होकेशन आदी २१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये झाल्या. परीक्षेला ३६९ विद्यार्थी बसले त्यापैकी १२ विद्यार्थी अनुपस्थित होते, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.